(३८)

अवसायनातील नागरी सहकारी बँकांचे
कामकाजाचे संनियंत्रण करणेबाबत

सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-411 001
दुरध्वनी क्रमांक 020-26122846/47 ईमेल-comm.urban@gmail.com

क्रमांक ना.बँका/१-सआ/ अवसायन कामकाज सनियंत्रणकक्ष/२०१८/1477
दिनांक ०२/०८/२०१८

## परिपत्रक

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०९(१) नुसार निबंधकाने मुदतवाढ केली नसेल तर कलम १०३ (२) खाली ज्यासाठी संस्था हक्कदार असेल किंवा हक्कदार असल्याचे दिसून येईल, ती सर्व मालमत्ता चीजवस्तू आणि कारवाई योग्य दावे आणि संस्थेच्या कामकाजाशी संबंधित असलेली पुस्तके, अभिलेख आणि इतर दस्तऐवज अवसायक आपल्या अभिरक्षेत आणि नियंत्रणाखाली ठेवील त्या तारखेपासून सहा वर्षाच्या आत व्यवहार्य होईल तितक्या लवकर संस्थेच्या अवसायनाची कार्यवाही बंद करण्यात येईल. सदर तरतुदीनुसार अवसायकाने अवसायन प्रक्रिया सहा वर्षाचे कालावधीत पुर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सदर मुदतीमध्ये काही कारणास्तव अवसायनाची कार्यवाही पुर्ण झाली नाही तर निबंधकास एका वेळेस अधिकतम एक वर्ष याप्रमाणे एकूण चार वर्षे एवढ्या कालावधीसाठी अवसायनास मुदतवाढ देता येईल अशी उक्त अधिनियमाचे कलम १०९(१) मध्ये तरतूद आहे. त्याचप्रमाणे अवसायनाची कार्यवाही अवसायकाच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे तो विहित मुदतीत पुर्ण करु शकला नाही तर निबंधकाने अवसायकाकडून अहवाल मागवून संबंधित संस्थेची मत्ता, मालमत्ता, इत्यादिची विक्री करुन रोख किंमत वसूल करावयाची राहून गेली असल्याबाबत निबंधकाची खात्री पटल्यास ते काम पुर्ण करण्यासाठी आणि अवसायनाच्या प्रयोजनासाठीच फक्त ती कार्ये पार पाडण्याचे आणि अवसायकाकडून अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून गणना केलेल्या एका वर्षापेक्षा अधिक



Scanned by CamScanner

नसेल अशा कालावधीच्या आत आपला अहवाल सादर करील असे अवसायकाला निर्देश देईल अशी उक्त अधिनियमाचे कलम १०९(१) चे दुसरे परंतुकामध्ये तरतूद आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०९(१) अन्वये अवसायन कामकाजास मुदतवाढ देताना संबंधित निबंधकाने अवसायन कामकाजाची सद्यस्थिती, अवसायनाचे शिल्लक कामकाज आणि अवसायन कामकाज समाप्त करणेसाठीचा संभाव्य कालावधी या बाबी विचारात घेवून अवसायन कामकाजास मुदतवाढ देणे आवश्यक असलेबाबतची समर्थनीय कारणे नमूद करुन सदर मुदतवाढ देणेबाबतच्या अधिकाराचा वापर योग्यरितीने करणे आवश्यक आहे. तथापि अवसायकाकडून अवसायन कामकाज विहित मुदतीमध्ये पुर्ण करण्याची बाब गंभीरपणे घेतली जात नाही तसेच अवसायन कामकाजास मुदतवाढ देणे आवश्यक आहे काय ? याची खात्री न करता निबंधकाकडून यंत्रवतपणे मुदतवाढ देण्यात येते असे या कार्यालयाचे निदर्शनास आले आहे.

अवसायनातील नागरी सहकारी बँकांच्या अवसायनाचे कामकाज प्राधान्याने व विहित मुदतीत पुर्ण करण्यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांना खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे -

**१. अवसायन कामकाज सनियंत्रण कक्ष :**

**अ)** अवसायनातील नागरी सहकारी बँकांच्या अवसायन कामकाजाचा सातत्यपूर्ण व सर्वंकष आढावा घेणे व सनियंत्रण करण्यासाठी जिल्हा स्तरावर, विभाग स्तरावर आणि राज्य/ मुख्यालय स्तरावर खालील प्रमाणे अवसायन सनियंत्रण कक्ष गठीत करण्यात येत आहे-

| अ.क्र. | पदनाम | हुद्दा |
|---|---|---|
| | **जिल्हा स्तर** | |
| १ | जिल्हा उपनिबंधक | अध्यक्ष |
| २ | जिल्हा विशेष लेखापरिक्षक | सदस्य |
| ३ | सहाय्यक निबंधक अधिन जिल्हा उपनिबंधक | सदस्य सचिव |
| | **विभाग स्तर** | |
| १ | विभागीय सहनिबंधक | अध्यक्ष |
| २ | विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) | सदस्य |
| ३ | विभागीय उप/ सहाय्यक निबंधक अधिन विभागीय सहनिबंधक | सदस्य सचिव |



Scanned by CamScanner

| अ.क्र. | पदनाम | हुद्दा |
|---|---|---|
| राज्य/मुख्यालय स्तर | | |
| १ | अपर आयुक्त व विशेष निबंधक | अध्यक्ष |
| २ | अपर निबंधक (लेखापरीक्षण) | सदस्य |
| ३ | विशेष लेखापरीक्षक (नागरी बँका) | सदस्य |
| ४ | उप निबंधक (नागरी बँका) | सदस्य |
| ५ | सहाय्यक निबंधक (नागरी बँका) | सदस्य सचिव |

**ब**) अवसायन सनियंत्रण कक्षाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील-

१. बँक निहाय अवसायन कामकाजाचा कालबध्द कृती कार्यक्रम तयार करवून घेणे.

२. कालबध्द कृती कार्यक्रमानूसार पुढील बाबींचा दरमहा आढावा घेणे-

i) कलम १०८ अन्वये लेखापरिक्षण व लेखापरिक्षण अहवाल दोष दुरुस्ती

ii) सर्व कर्जदार/ऋणको यांचे विरुध्द वसूली प्रमाणपत्र/हुकूमनामा प्राप्त करणे (कलम १०१/ कलम १०५/कलम ९१/९८)

iii) सर्व कर्जदार/ऋणको यांच्या मालमत्तांचा शोध घेणे व मालमत्ता जप्ती करणे आणि मालमत्तेवर भार निर्माण करणे.

iv) कर्जदाराच्या जप्त केलेल्या व विक्री करावयाच्या मालमत्तांच्या अपसेट प्राईसला मान्यता देणे व विक्री कायम करणे.

v) डीआयसीजीसी यांचेकडून प्राप्त क्लेम वाटप करणे, केवायसी निकष पर्तता न करणा-या / ठावठिकाणा नसलेल्या/मागणी न करणा-या ठेवीदारांच्या क्लेम रक्कमा डीआयसीजीसी यांना परत करणे, डीआयसीजीसी यांचेकडून प्राप्त क्लेम रकमेची परतफेड करणे.

vi) रुपये एक लाखावरील धनको/ ठेवीदारांना रक्कम परतफेड करणे.

vii) बँकेच्या स्वामालकीच्या स्थावर मालमत्ता/जंगम मालमत्ता विक्री /हस्तांतरण/वर्ग कार्यवाही (मुल्यांकन करणे, वाजवी किंमतीस मान्यता व विक्रीस मान्यता, जाहिर लिलाव करणे व विक्री कायम करणे)

३. अवसायन कालावधीस मुदतवाढ कार्यवाही

४. नैमित्तीक कारणामुळे अवसायक बदल झाल्यास अवसायकाचा पदभार देणे



Scanned by CamScanner

५. एक रकमी कर्ज परतफेड योजना व समझोता योजना/तडजोड अंमलबजावणी

६. इतर सहकारी संस्थांनी गुंतविलेल्या रकमा परत करणे

७. न्यायालयीन प्रकरणांचा आढावा-विशेषत: स्थगीती प्रकरणात स्थगीती उठविण्यासाठी आणि शक्य तितक्या लवकर निर्णय प्राप्त करणेसाठी विनंती अर्ज दाखल करणे

८. नोंदणी रद्द करणे

९. डिड ऑफ असाईनमेंट, कस्टोडीयन/रिसिव्हर नियुक्ती कार्यवाही

१०. कस्टोडीयन/रिसिव्हर कामकाज आढावा.

क) अवसायनातील नागरी सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र काहीही असले तरी बँकेचे मुख्यालय ज्या जिल्ह्यात आहे त्या जिल्हा स्तरावरील कक्षाने उपरोक्त् प्रमाणे कार्यवाहीचा दरमहा आढावा घेवून ५ तारखेपूर्वी याबाबतचा अहवाल विभाग स्तरावरील कक्षास सादर करण्याचा आहे तसेच विभाग स्तरावरील कक्षाने विभागातील सर्व जिल्हा स्तरावरील कक्षांच्या कामकाजाचा दरमहा आढावा घेवून १० तारखेपूर्वी याबाबतचा अहवाल राज्य/मुख्यालय स्तरावरील कक्षास सादर करण्याचा आहे.

राज्य/मुख्यालय स्तरावरील कक्षाने राज्यातील सर्व विभाग स्तरावरील कक्षांच्या कामकाजाचा त्रैमासिक आढावा घेवून दिनांक २० जुलै, दिनांक २० ऑक्टोंबर, दिनांक २० जानेवारी आणि दिनांक २० एप्रिल पुर्वी याबाबतचा अहवाल सादर करावा. तसेच अवसायनातील सर्व नागरी सहकारी बँकांच्या कामकाजाचे सर्वसाधारण संनियंत्रण व मार्गदर्शन करावे.

**२. अवसायन कामकाजास मुदतवाढ :**

**अ)** जिल्हा उपनिबंधक आणि विभागीय सहनिबंधक यांचे अधिकारक्षेत्रातील अवसायनातील नागरी सहकारी बँकांच्या अवसायन कामकाजास सहा वर्षापेक्षा अधिकच्या कालावधीसाठी मुदतवाढ प्रदान करताना संबंधित निबंधक कार्यालयाने अवसायकाने विहित मुदतीत केलेले कामकाज, ज्या कारणांमुळे विहित मुदतीत कामकाज पुर्ण होवू शकले नाही ती कारणे, अवसायन कामकाजाची सद्यस्थिती, अवसायनाचे शिल्लक कामकाज आणि अवसायन कामकाज समाप्त करणेसाठीचा संभाव्य कालावधी यांचा उहापोह करुन समर्थनीय कारणे नमूद करुन अवसायनाची सध्याची मुदत संपण्याच्या दिनांकापुर्वी किमान तीन महिने आधी अवसायन कामकाजास मुदतवाढ देण्याबाबत आदेश निर्गमित करावेत.या करीता संबंधीत अवसायकाने अवसायनाची सध्याची मुदत संपण्याच्या



Scanned by CamScanner

दिनांकापुर्वी किमान चार महिने आधी अवसायन कामकाजास मुदतवाढ मिळणेबाबतचा परीपूर्ण प्रस्ताव संबंधीत निबंधकाकडे दाखल करावा.

ब) राज्य स्तरीय नागरी सहकारी बँकांच्या अवसायन कामकाजास मुदतवाढ मिळणे आवश्यक असल्यास संबंधित अवसायकाने या कार्यालयाचे पत्र दिनांक १०/५/२०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रासहीत अवसायन कामकाजाचा कालावधी संपण्यापुर्वी किमान चार महिने अगोदर प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त होईल अशा रीतीने सादर करावा.

**३. स्वमालकीच्या/पागडीच्या स्थावर मालमत्तांची विक्री :**

**अ)** अवसायनातील नागरी सहकारी बँकांच्या स्वमालकीच्या मालमत्ता जाहिर लिलावाने विक्री करणेसाठी स्थावर मालमत्तेचे मुल्यांकन मान्यताप्राप्त शासकीय मुल्यांकनकार यांचेकडून करुन घ्यावे. ज्या मालमत्तेची किंमत रु.१ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा मालमत्तेचे मुल्यांकन दोन स्वतंत्र मान्यताप्राप्त शासकीय मुल्यांकनकारांकडून करुन घ्यावे.

**ब)** स्थावर मालमत्तेचे वाजवी किंमतीस मान्यता देणे व विक्रीपुर्व परवानगी देणे तसेच जाहिर लिलावानंतर विक्री कायम करण्यास मान्यता देणे याबाबतची कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी करावयाची आहे. अवसायनातील नागरी सहकारी बँकेचे कार्यक्षेत्रानुसार संबंधीत निबंधकाचे, विक्रीयोग्य मुल्यांकन/वाजवी किंमतीस मान्यता देणे व विक्रीपुर्व परवानगी देणे व विक्री कायम करण्याचे अधिकार पुढिलप्रमाणे राहतील-

| अ. क्र. | स्थावर मालमत्तेचे विक्रीयोग्य मुल्यांकन/विक्री किंमत | मुल्यांकन/वाजवी किंमत व विक्री कायम करण्यास मान्यता देण्यास सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | रुपये ५० लाखापर्यंत | जिल्हा उप निबंधक |
| २ | रुपये ५० ते १०० लाखापर्यंत | विभागीय सहनिबंधक |
| ३ | रुपये १ कोटी व त्यापेक्षा अधिक | सहकार आयुक्त व निबंधक |

**क)** स्थावर मालमत्तेचे मालमत्तेचे विक्री मुल्य हे मान्यता दिलेल्य विक्रीयोग्य मुल्यांकनापेक्षा कमी आल्यास त्याबाबत फेरविक्री पध्दती अवलंबताना या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.औद्यो/सी-१/०२/प्र.नो.२५/अवसायन दिनांक ५/३/२००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.



Scanned by CamScanner

ड) सक्षम प्राधिकारी यांनी अवसायकाने सादर केलेले स्थावर मालमत्तेचे विक्रीयोग्य मुल्यांकन/ वाजवी किंमतीस मान्यता देणे, विक्रीपुर्व परवानगी देणे, विक्री कायम करणे याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

**४. कर्जदारांच्या स्थावर मालमत्तांची विक्री करणेसाठी अपसेट प्राईस मंजूरी:**

अवसायकाने सादर केलेले कर्जदारांच्या स्थावर मालमत्तांची विक्री करणेसाठीचे वाजवी किंमतीस (अपसेट प्राईस) मान्यता देणे बाबतचे प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांचे आत मान्यता देण्याची कार्यवाही संबंधीत निबंधकाने करावी. राज्य कार्यक्षेत्र असलेल्या अवसायनातील नागरी सहकारी बँकांचे बाबत या कार्यालयाचे जा.क्र.ना.बँका/डि-4/अपसेटप्राईस व विक्री कायम/२०१५/८७० दिनांक १७/४/२०१५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**५. अवसायन कामकाजाचा त्रैमासिक प्रगती अहवाल :**

अवसायनातील नागरी सहकारी बँकांच्या अवसायकाने डीआयसीजीसी आणि सहकार आयुक्त कार्यालयास सादर करावयाचे त्रैमासिक प्रगती अहवाल त्रैमासिक दिनांक ५ जुलै, दिनांक ५ ऑक्टोंबर, दिनांक ५ जानेवारी आणि दिनांक ५ एप्रिल पुर्वी संबंधीत निबंधकास व डीआयसीजीसी यांना सादर करावा. विभागीय सह निबंधक यांनी विभागातील सर्व अवसायनातील बँकांचे त्रैमासिक अहवाल उपरोक्त निर्धारीत महिन्याच्या १० तारखेपूर्वी सहकार आयुक्त कार्यालयास सादर करावेत.

सर्व अवसायनातील नागरी सहकारी बँकांच्या अवसायकांनी, संबंधीत निबंधक आणि सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी. सर्व विभागीय सहनिबंधक यांनी विभागातील सर्व जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक आणि अवसायनातील नागरी सहकारी बँकांच्या अवसायकांना सदर परिपत्रक निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत आपले स्तरावरून निर्देशित करण्यात यावे.

**( डॉ.विजय झाडे )**
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे**



Scanned by CamScanner

प्रति

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)

२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक,वर्ग १, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत -**

अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, म.रा., पुणे

अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, म.रा., पुणे

**( डॉ.विजय झाडे )**
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**



Scanned by CamScanner